11 (११) द्वितीय क्रमांक: सौ.- अलका वडवकर

# "आजची युवा पिढी खरंच विचारी आहे का?"

फेब्रुवारी २०१९ मध्ये लोकसत्ताच्या 'वक्तृ दशसहस्त्रेषु' उपक्रमांतर्गत; महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व स्पर्धेच्या, महाअंतीम सोहळ्यास षण्मुखानंद हॉलमधे जाण्याचा मला योग आला होता.

अंतीम फेरीतील १८ ते २० वयोगटातील आठ विद्यार्थ्यांची विविध विषयावरची भाषणं ऐकून मी अवाक् झाले. बापरे! त्या वयात काय त्यांचे सखोल विचार! अतिशय अभ्यासपूर्वक मांडणी करत त्या मुलांनी आपले मुद्दे अगदी ठामीवपणे मांडले. मी अक्षरशः भारावून गेले, आणि आजच्या युवापिढीकडे बघण्याचा माझा दृष्टीकोनच बदलून गेला.

त्यांचे विचार ऐकल्यापासून एक गोष्ट माझ्या मनावर ठसली की बदलत्या काळानुसार तरुण पिढीची विचारांची परिभाषा बदलते आहे. आजूबाजूच्या घटना नविन असोत वा जुन्या असोत त्यावर व्यक्त होतांना फक्त शब्दभांडार आणि वक्तृत्व पुरेसं नाही तर त्या घटनेच्या मुळाशी जात सारासार विश्लेषण करत आपला नवा स्वतंत्र विचार प्रभावीपणे मांडण्याची गरज असते तरच तो सामान्यांच्या मनात रुजेल. ही क्षमता आज च्या युवा पिढीत आहे. त्यांची आकलन शक्तीही प्रचंड आहे. खरंच किती विचारी आहे आजची युवा पिढी.

माझ्या मते युवा पिढीचे दोन टप्प्यात वर्गीकरण करता येईल. पहिला टप्पा वय वर्ष १८ ते साधारण २३ आणि २३ ते ४५ हा दुसरा टप्पा.

पहिल्या टप्प्यातल्या तरुण मुलांचा फोकस हा प्रामुख्याने उत्तम शिक्षण घेण्याकडे असतो. त्याबरोबर इतरही क्षेत्रात त्यांचं वैचारिक पाऊल पडलेलं दिसतं. विचारांची एक पक्की बैठक तयार होत असते. मी सुरुवातीला दिलेलं उदाहरण त्यासाठी पुरेसं बोलकं आहे. अभ्यासक्रम, करियर ह्या विषयी त्यांचं मत ठाम असतं. मोठ्यांच्या न पटणाऱ्या गोष्टी नाईलाजास्तव स्विकारतांना ही पिढी दिसत नाही.

पुढच्या टप्प्यावरच्या म्हणजे पंचविशीतील तरुणांची शिक्षण पूर्ण होऊन आर्थिक दृष्ट्या सक्षम होण्याची सुरुवात झालेली असते. पुढे पुढे वाढतं वय, नोकरीतील

अनुभव आणि जबाबदाऱ्यांमुळे तिथले निर्णय घेण्याची त्यांची क्षमता वाढलेली दिसते. तसेच काही कौटुंबिक निर्णय घ्यायला त्यांना आईवडिलांवर अवलंबून राहण्याची फारशी गरज भासत नाही. आपले विचार तर्कशुद्धपणे त्यांना पटवून देण्याची खुबी त्यांनी आत्मसात केलेली आहे. परिपक्व विचारांची दूरदृष्टी या तरुण पिढीकडे आहे असं म्हटलं तर वावगं ठरू नये. आर्थिक तरतूदी बरोबर भविष्याचे अनेक प्लॅन्स आखलेले असतात त्यांनी. तसेच जीवनातले आनंदाचे क्षणही उपभोगतांना दिसतात अधूनमधून.

एकविसाव्या शतकात सामाजिक परिवर्तनाचे वारे वेगाने वाहातायत. काळाची ही पावलं आजच्या युवा पिढीने ओळखली आहेत. काय बरोबर काय चूक हे जाणून आहेत ते. म्हणून तर आपल्या स्पष्ट विचारातून जनजागृती करून समाजाला पुढे नेऊ पाहातायत हे युवक. अंधश्रद्धा आणि अनिष्ट रूढी परंपरेला छेद देण्याची तळमळ मला त्यांच्या कृतीतून दिसते. मग ती स्त्रीच्या कौमार्यभंगाच्या 'कुकरी' प्रथेविषयी आवाज उठवणं असो वा 'मासिक पाळी' दरम्यान स्त्रीवरील बंधनाबाबत असो किंवा एखाद्या मंदिरात केवळ स्त्री म्हणून तिला प्रवेश नाकारण्याबाबत असो. समाजाला निर्भीडपणे टक्कर देण्याचा विचार, ही युवा पिढीची वैचारिक पात्रता ठरवते.

तसेच पर्यावरण दक्षता मंच, अंधश्रद्धा निर्मूलन समिती, प्राणिमित्र मंडळ, नैसर्गिक आपत्ती येता घटनास्थळी धावून जाणं, आर्थिक मदतीचा हात पुढे करणं, इतकंच काय ग्रामीण भागातील, तळागाळातील लोकांच्या किमान जीवनावश्यक गरजा पुरवण्यासाठी तिथे जाऊन सक्रिय सहभाग घेणं इ. सामाजिक कार्यात युवकांचा मोठाच हातभार असतो हे आपण वाचतो, पाहतो. तो माणुसकी धर्म, ही पिढी विचारी असल्याशिवाय का निःस्वार्थपणे पाळतात? खेड्यात काम करणाऱ्या डॉक्टर्स तरुणांचं कौतुकच आहे.

युवा पिढीच्या जमेच्या विचारसरणीबाबत मला एक गोष्ट अधोरेखीत करावीशी वाटते ती म्हणजे त्यांच्याठायी असलेलं 'सामाजिक भान' आणि बांधीलकी. ज्यांना वेळ आहे ते युवक काय किंवा असे अशी उच्च शिक्षित युवा पिढीही सामाजिक कार्यात ओढून काम करणारी आहे. तेही आपले नोकरी व्यवसाय सांभाळून.

असे कितीतरी प्रकल्प युवा पिढीच्या हिंमतीवर उभे आहेत आज. वानगीदाखल म्हणायचं तर अमीर खानने राबवलेला पाणी फाऊंडेशन प्रकल्प आणि 'नाम' हा शेती प्रकल्प. शहर, खेड्यातला अनेक तरुणांच्या खारीचा वाटा आहे त्यांत. सर्वश्रुत असलेल्या आनंदवन, हेमलकसा, गडचिरोलीमधील आदिवासी भागातही तरुण वर्ग कार्यरत दिसतो. इथे माझा सांगायचा मुद्दा हा आहे की समाजाचा किती जाणीवपूर्वक विचार करते आजची युवा पिढी.

आजचं युग हे "तंत्रज्ञानाचं" आहे. ही पिढी धाडसीपणाने विविध प्रयोग करून देशाच्या विकासासाठी हातभार लावत आहे. युवा पिढी, अनुभवी आणि जेष्ठ लोकांचं मार्गदर्शन घेत, महत्वाकांक्षा ठेवून जिद्दीने पुढे चालली आहे. अनेक तरुण संशोधक-वैज्ञानिक यातून निर्माण होत आहेत. हे निर्विवाद सत्य आहे की ह्या पिढीची वैचारिक झेप गरुडाची आहे. चांद्रयान सोडण्याच्या वेळी अनुभवी आणि अफाट बुद्धिमत्ता असलेल्या जेष्ठ वैज्ञानिकांसमवेत अनेक तरुण इंजिनियर्सची टीम महिनं-महिने अहोरात्र झटत होती.

सदर निबंधाच्या सखोल विचार करता माझ्या असं लक्षात येतंय की आपली भारतीय संस्कृती ही विज्ञानावर आधारित आहे. वेद आणि पुराणात विज्ञान शास्त्राचा उगम आहे. हे तरुण पिढीनेही जाणले आहे. पंचमहाभूतांच्या ५ तत्वांचा उपयोग गेली दशकोदशके जो केला गेला. त्यात विविध प्रयोग आजही चालूच आहे. सूर्याच्या प्रचंड ऊर्जा स्त्रोतातून सोलर म्हणजे सौरऊर्जेचा शोध लावला गेला, आप (पाणी) तत्वापासून पवनचक्की आणि पाण्यावर चालणारी ऑप्टीक जनरेटर तयार केली गेली... त्यात नाविन्य उपयुक्त असं शोधायचा प्रयत्न ही पिढी करत आहे. हवेतील कार्बन वायूचे संतुलन राखण्यासाठी बॅटरीवर चालणाऱ्या मोटारी आल्यात. होमीभाभांचा उल्लेख मी करू इच्छिते अभ्यासाठी की त्यांच्या अणूरेणू विभाजनाच्या प्रयोगाचा आदर्श ठेवणारी अशी ही आजची युवा पिढी विचारी आहे हे नाकारता येणारच नाही. हे जरी उच्चशिक्षित तरुणांविषयी झालं तरी सर्वसाधारण तरुणांच्या विचारीपणाचेही दाखले देता येतील. उदाहरणार्थ —

नेहमीचं चाकोरीबद्ध जीवन सोडून नोकरीऐवजी व्यवसाय उद्योगात ही पिढी धडाडीने उतरली आहे. सरकारही अशा Startup साठी पाठबळ देत आहे. कोणत्याही देशाच्या अर्थकारणात उद्योगधंद्याचा मोठा वाटा आहे. आज तरुण उद्योजकांची संख्या वाढली आहे. करून न करून देशाच्या विकासकामी आजची युवा पिढी कार्यरत आहे हे त्यांच्या विचारीपणाचे द्योतक आहे. मुलं मुली हा भेदच नाही इथे. उद्योगधंदा मग तो लघु-उद्योगही असू शकतो. उद्योग व्यवसायात धाडसी पाऊल टाकणारी अशी ही युवापिढी विचारीच आहे.

युवापिढीचा 'विचारयज्ञ' असाच तेवत ठेवायचा असेल तर आमच्या ज्येष्ठ पिढीने 'आमच्यावेळी' च्या पालूपदाला कुरवाळत न बसता आपलीही मानसिकता हळूहळू बदलली पाहिजे. आम्ही काय करतो तर आमच्या जुन्या सवयींना 'संस्कारांचं' लेबल लावून त्यातच स्वतःला गुरफटून घेतो आणि तुलना करत बसतो दोन काळांची, मग आजच्या युवापिढीनी केलेली कोणतीही गोष्ट त्यांना अविचारीच वाटते.

मला एक सुचवावंसं वाटतं की बदलाला ओळखून तो स्विकारणं आणि त्याच्याशी मैत्री करणं ही खरी परिपक्वता. जी ज्येष्ठांनी आत्मसात केली पाहिजे. आज नव्या पिढीचे प्रश्न वेगळे आहेत आणि त्यांची उत्तरही त्यांनाच शोधायची आहेत. त्यांच्या या संक्रमण काळात वरच्या पिढीनी विरोध दर्शवण्यापेक्षा खुल्या मनाने, प्रेमाने युवा ~~पिढीला~~ पिढीवर विश्वास टाकला तर त्यांना निश्चितच पटेल की आजची युवा पिढी विचारी आहे.

युवा पिढीच्या विचारीपणाचं समर्थन करता करता मला ह्या संदर्भातल्या काही अपवादात्मक मुद्द्यांची बाजू मांडाविशी वाटते. ज्याची ओरड समाजात ऐकू येते. अतीस्वातंत्र्याच्या नांवाखाली माजलेली तरुणांची स्वैराचारी वृत्ती, पाश्चात्यांच्या अनुकरणापायी होत असलेला संस्कृतीचा ऱ्हास, बलात्कार, विनयभंग, ॲसिड फेक, कॉलेजमधील रॅगिंग, लहान वयात मुलांना व्यसनं, नैराश्य, आत्महत्या, कुटुंबव्यवस्थेचं विभाजन आणि वाढते वृद्धाश्रम ह्या समस्या आज ऐरणीवर आहेत. माझ्या मते ह्या प्रश्नांची उकल सर्व मिळून गांभीर्याने होणं गरजेचं ...

कोणत्याही समस्येचं निराकरण व्हायला वेळ लागतो. ती दुरावस्था बदलण्यासाठी प्रयत्न करणं आपल्या हातात आहे. समाजातील काही युवक असे का वागतात? ह्या प्रश्नांतर्गत त्यांची 'मानसिकता' जाणून घेऊन सुजाण नागरिक जर त्यांचा 'दीपस्तंभ' बनले तर ह्या युवकांच्यात सुधारणा व्हायला निश्चीतच मदत होईल. केल्याने होत आहे रे... आधी केलेचि पाहिजे... समर्थ रामदासांनी म्हणूनच ठेवलंय की!

कुटुंब व्यवस्थेबद्दल थोडं बोलायचं झालं तर नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने कुटुंब विभक्त झाली. दोन पिढीतली दरी, हेवेदावे मतभेद, इ. टाळण्यासाठी मुलं स्वतंत्र राहू लागली. ह्याचा अर्थ कुटुंब तुटलेली नाहीत. दूर राहूनही मुलं आईवडिलांची जबाबदारी घेतायत असंही चित्र दिसतं. तीच गोष्ट वृद्धाश्रमाबाबत. वृद्धाश्रम ही काळाची गरज आहे आज. आधुनिक जगाशी जुळवून घेतांना तरुण पिढी अनेक पातळ्यांवर झगडत आहे. त्याचाही विचार वरच्या पिढीने करायला हवा असं मी अनुभवातून सांगते.

आजची युवा पिढी 'विचारी' आहे ह्या विधानाकडे जेव्हां मी सकारात्मकतेने पाहते तेव्हां एक महत्वाची गोष्ट माझ्या लक्षात येते ती म्हणजे... आज घटनेने १८ वर्षे पूर्ण असलेल्या मुलं मुलींना मतदानाचा हक्क दिलेला आहे ह्याचा अर्थ ही पिढी चांगल्या वाईटाचा विचार करून योग्य नेतृत्व निवडू शकते हे घटनेने देखील मान्य केलं आहे. पूर्वीच्या तुलनेत आज राजकारणात देखील युवा पिढीचं अस्तित्व दिसतं. हे खरंच स्विकारार्ह आहे. आमची संपूर्ण युवापिढी हे देशाचे भवितव्य आहे. ते उज्वलंच असणार असं माझं ठाम मत आहे.

अजून एक महत्वाचा मुद्दा मी अधोरेखीत करू इच्छिते की, तंत्रज्ञानाच्या-विज्ञानाच्या युगातील आजची युवा पिढी श्री समर्थ रामदास स्वामींच्या दासबोधाच्या अभ्यास करतांना दिसते. MBA च्या अभ्यासक्रमाचा तो एक भाग आहे. दासबोधातील वचनं आचरणात आणली जात आहेत. तसंच पंढरपुरच्या वारीतल्या युवकांचा सहभाग आपल्या डोळ्यासमोर आहे. संत वाङमयावर ही पिढी डॉक्टरेट करत आहे. अध्यात्मिक वाटेवरच्या त्यांच्या ह्या प्रवासातून त्यांची वैचारिक पातळी लक्षात येते.

ह्या युवापिढीची एक गोष्ट मला वाखाणण्यासारखी वाटते ती म्हणजे पूर्वापार चालत आलेली पुरुषप्रधान संस्कृती, पितृसत्ताक पद्धती ह्यांना त्यांनी आमुलाग्र केलेला बदल. स्त्रीयांना दिलेलं स्वातंत्र्य, त्यांच्याही मताची कदर करणं हा काळानुरूप झालेला केवढा बदल! इतकंच काय वर्षानुवर्ष स्त्रीयांनीच करावयाच्या घर कामात आज ही तरुण पिढी आपल्या आई-वडीलांना बरोबरीने मदत करतांना दिसून येते. पुरुषी मानसिकता बदलणं हे ह्या पिढीचं विचारीपणाचं वास्तव आहे हे कुणालाही पटेल ह्याची मला खात्री आहे.

आज मुलं मुली आपल्या जोडीदारांच्या निवडीबाबतचे निर्णयही स्वतःच घेतात. जिच्याबरोबर / ज्याच्या बरोबर उभं आयुष्य घालवायचं त्यांचे विचार परस्परांना पटल्याखेरीज ते होकार देत नाहीत. त्यांचा हा विचार योग्य आहे.

अनेक क्षेत्रात घोडदौड करणाऱ्या आजच्या विचारी युवा पिढीचं मी कौतुक करते. मला अभिमान आहे त्यांच्या वैचारिक परिपक्वतेचा.

'आजची युवा पिढी विचारी आहे' ह्या बाजूनी ~~सिंहावलोकन करतांना~~ केल्यावर जाता जाता दोन उदाहरणं मला आवर्जून नमूद करावीशी वाटतात ती म्हणजे.... युवा पिढीच्या वैचारिक पातळीचं मूळ हे पार शिवाजी महाराजांपर्यंत जाऊन पोहोचतं. वयाच्या अवघ्या १४ व्या वर्षी त्यांनी मोठ्या धाडसाने तोरणा' किल्ला जिंकला होता. तरुणपणातच मुत्सद्देगिरीने अनेक गड जिंकले होते.

आलंच तर माधवराव पेशव्यांनी देखील तरुणपणातच पेशवेपद स्विकारलं होतं, निभावलं होतं. पानिपतच्या लढाईत कोसळलेलं मराठी साम्राज्य त्यांनी सावरलं अन् पुन्हा दबदबा मिळवून दिला.

भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातही अनेक भारतीय युवकांचं बलिदान होतं.

अशा ह्या सगळ्या महापुरुषांकडून आमची युवा पिढी प्रेरणा न घेतील तरच नवल!

म्हणून तर मी पुनःपुन: निक्षून सांगू इच्छिते की 'आजची युवा पिढी खरंच विचारी आहे.'

X